RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ८, अंक ९१] मंगळवार, जुलै ५, २०२२/आषाढ १४, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २४९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ जुलै २०२२.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक जमीन-२०२१/प्र.क्र. १७०/ज-१.— महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. अधि. ४१) च्या कलम ३२८ आणि कलम २९अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून " महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे) नियम, २०१९" यामध्ये सुधारणा करण्यासाठी योजिले आहे. त्या नियमांचा पुढील मसुदा उक्त संहितेच्या कलम ३२९ च्या, पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, त्याद्वारे बाधा पोहचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा ४ ऑगस्ट २०२२ रोजी किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

**२.** उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तींकडून महाराष्ट्र शासनाचे अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, यांचेकडे वरील दिनांकापूर्वी येणाऱ्या/प्राप्त होणाऱ्या हरकती किंवा सूचना शासन विचारात घेईल.

**नियमांचा मसुदा**

**१.** या नियमांना, " महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे) (सुधारणा) नियम, २०२२ " असे म्हणावे.

**२.** “ महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे) नियम, २०१९ ” मधील नियम क्रमांक ३ च्या उप नियम ४ मधील तक्त्यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :—

(अ) परिच्छेद (अ)

(i) रकाना क्रमांक (३) येथील शीर्षकामध्ये “ तीन वर्ष ” ऐवजी “ पाच वर्ष ” असे वाचण्यात यावे.

(ii) रकाना क्रमांक (४) येथील शीर्षकामध्ये “ तीन वर्ष ” ऐवजी “ पाच वर्ष ” असे वाचण्यात यावे.

(ब) परिच्छेद (ब)

(i) रकाना क्रमांक (३) येथील शीर्षकामध्ये “ तीन वर्ष ” ऐवजी “ पाच वर्ष ” असे वाचण्यात यावे.

(ii) रकाना क्रमांक (४) येथील शीर्षकामध्ये “ तीन वर्ष ” ऐवजी “ पाच वर्ष ” असे वाचण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रमेश चव्हाण,**
शासनाचे सहसचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 5th July 2022.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No. Jamin-2021/C.R. 170/J-1.— The following draft of rules to amend the Maharashtra Land Revenue (Conversion of Occupancy Class-II and Leasehold lands into Occupancy Class-I lands) Rules, 2019, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by section 29A and 328 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) and of all other powers enabling it in that behalf is hereby published as required by sub-section (*1*) of section 329 of the said Code, for information of all the persons likely to be affected thereby ; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 4th August 2022.

2. Any objection or suggestion which may be received by the Additional Chief Secretary to Government of Maharashtra, Revenue and Forests Department, Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032 from any person with respect to the said draft on or before the aforesaid date will be considered by the Government.

## DRAFT RULES

**1.** These rules may be called the Maharashtra Land Revenue (Conversion of Occupancy Class-II and Leasehold lands into Occupancy Class-I lands) (Amendment) Rules, 2022.

**2.** In rule 3 of the Maharashtra Land Revenue (Conversion of Occupancy Class-II and Leasehold lands into Occupancy Class-I lands) Rules, 2019, in sub-rule (*4*) in the Table,—

(*a*) in paragraph (*A*),—

(*i*) in column (*3*), in the heading for the words "three years" the words "five years" shall be substituted ;

(*ii*) in column (*4*), in the heading for the words "three years" the words "five years" shall be substituted ;

(*b*) in paragraph (*B*),—

(*i*) in column (*3*) in the heading for the words "three years" the words "five years" shall be substituted ;

(*ii*) in column (*4*) in the heading for the words "three years" the words "five years" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAMESH CHAVAN,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.